# अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक

**आयोजित**

**अभिव्यक्तिबद्दल....**

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत माध्यमांची भुमिका महत्वाची असते. हीच भुमिका अधिक बळकट करून सामाजिक परिवर्तनाला दिशा देण्यासाठी अभिव्यक्ति हि सामाजिक संस्था माध्यम व संवाद या क्षेत्रात गेल्या ३२ वर्षापासून कार्यरत आहे. लोकव्यवहारात माध्यमांचा वापर आणि माध्यम व्यवहारात लोकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने लोकांच्या गरजांबद्दल संवेदनशील असणाऱ्या माध्यमांना पुढे आणण्यासाठी व माध्यमांचा वापर वाढविण्यासाठी अभिव्यक्तीने नेहमीच पुढाकार घेतला आहे.

**कार्यशाळेबद्दल....**

अभिव्यक्तिने आजवर विविध शैक्षणिक–सामाजिक संस्था, संघटना आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांसोबत माध्यमांचे कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देवून त्यांना माध्यम साक्षर आणि चिकित्सक केलेले आहे. समाजासोबत काम करीत असताना कार्यकर्त्याला प्रशिक्षणातून शास्त्रशुद्ध माहिती मिळते, नवीन दिशा आणि ऊर्जा मिळते. आजपर्यंत अभिव्यक्तिने संवादकौशल्य,नेतृत्व कौशल्य,लेखन कौशल्य,व्यक्तिमत्व विकास, सुजाणपालकत्व,लिंगभाव, दस्ताऐवजीकरण, फिल्म मेकिंग अशा विविध विषयावर यशस्वीपणे प्रशिक्षण घेतली आहेत. कार्यकर्ते त्यांचा कामात या प्रशिक्षणाचा उपयोग करत आहे हे आमचे यश आहे. या वर्षीही अभिव्यक्तीने सामाजिक संस्था– संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी अहवाल लेखन व दस्तऐवजीकरण या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.



## दस्तऐवजीकरण कार्यशाळा



**कालावधी – ४ दिवस दिनांक : ४ ते ७ नोव्हेंबर २०१९**
**(नावनोंदणी अंतिम मुदत दिनांक २२ ऑक्टोबर २०१९)**

**या कार्यशाळेत कोण सहभागी होऊ शकतो ?**
सामाजिक संस्था – संघटनेचे कार्यकर्ते

**– कार्यशाळेची वैशिष्ट्ये –**
प्रशिक्षणात सहभागी पद्धतीचा अवलंब
प्रात्यक्षिकातून शिकण्यावर भर
तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन

**– या कार्यशाळेतील प्रमुख मार्गदर्शक –**
**हर्ष गुप्ता – एच्. जी. फोटोग्राफी, मुंबई**
**नितीन परांजपे, अविनाश नेवे – अभिव्यक्ति संस्था, नाशिक**

सामाजिक संस्था– संघटना आज समाज परिवर्तनासाठी कार्य करीत आहे परंतु दस्तऐवजीकरणाच्या कामाला फारसे महत्व दिले जात नाही. स्थानिक पातळीवर केलेल्या कामांमधून निर्माण होणाऱ्या माहिती आणि ज्ञानाचा अभाव दिसतो, सामाजिक कार्याचे अहवाल लेखन करणे हे खूप कंटाळवाणे आहे अशी कार्यकर्त्यांची समजूत होत चालली आहे. संस्थांनी केलेल्या कामाच्या नोंदी परिणामकारक आणि सृजनशील पद्धतीने करणे हे आज एक आव्हान झाले. दस्तऐवजीकरण संकल्पना, त्याच्या विविध पद्धती आणि प्रकार काय आहेत आणि तळागाळातील संस्था आणि व्यक्ती यांचा दस्तऐवजीकरण प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढावा, सामाजिक भावना वृद्धिंगत व्हावी या गरजा ओळखून अभिव्यक्तिने दस्तऐवजीकरण कौशल्य या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

---

**कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी www.abhivyakti.org.in येथे करता येईल.**

---

**कार्यशाळेचे ठिकाण : लेसली साहनी सेंटर, केंद्रिय विद्यालयासमोर, देवी मंदिराच्या पुढे, भगूर रोड, देवळाली कॅम्प, नाशिक**

- प्रशिक्षण दरम्यान भोजन व राहण्याची व्यवस्था करण्यात येईल.
- सहभागीने  प्रवास खर्च स्वत: करावयाचा आहे.
- कार्यशाळेत भाषेचे माध्यम प्रामुख्याने मराठी तर गरजेप्रमाणे  हिंदी किंवा इंग्रजी असेल.
- प्रशिक्षण पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थींला  सहभागपत्र देण्यात येईल.
- सहभागिनी कार्यशाळास्थळी आदल्या दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोहचावे.
- कार्यशाळेची वेळ दररोज सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० अशी असेल

सहभाग मूल्य - प्रती व्यक्ती एका कार्यशाळेसाठी फक्त रु. ३०००/- आहे  सहभाग मूल्य  रोख, डिमांड  ड्राफ्ट किंवा नेटबँकिंगद्वारे देण्यात यावे.

संपूर्ण १००% सहभाग मूल्य भरून कार्यशाळेत सहभाग निश्चित होईल

सहभागींनी  नावनोंदणी केल्यावर  सहभाग मूल्य त्वरित डिमांड  ड्राफ्ट  किंवा नेटबँकिंगद्वारे  जमा करण्यात  यावे आणि बँकेची स्लिप मेल करावी व तसे कळवावे.

डिमांड  ड्राफ्ट **'Abhivyakti Media for Development - HO'** यानावाने नाशिक देय काढण्यात यावा  किंवा नेटबँकिंगद्वारे
**HDFC Bank Account No - 00641000016625**
**MICR CODE : 422005**
**IFSC/ NEFT/RTGS : HDFC0000064**
या खात्यावर ट्रान्सफर करण्यात यावे. एकदा भरलेले सहभाग मूल्य कुठल्याही कारणास्तव परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

काही माहिती हवी असल्यास किंवा अडचण असल्यास आमच्याशी  खुलेपणाने संपर्क करावा.

**कार्यशाळेचे स्थळ -  लेसली साहनी सेंटर,**
८३, रेस्ट कॅम्प रोड, केंद्रिय विद्यालय क्रमांक १ चे समोर, समोर, देवी मंदिराचे पुढे,  देवळाली कॅम्प, भगूर रोड,  नाशिक पिन ४२२४०१

**प्रशिक्षण स्थळी पोहचण्याबाबत-**
१) रेल्वेने आल्यास नाशिकरोड किंवा देवळाली कॅम्प या स्टेशनवर उतरणे तेथून बस अथवा शेअर रिक्षाने लेसली सहानी सेंटर, भगूर, नाशिक येथे यावे.

२) बसने आल्यास द्वारका किंवा सीबीएस येथून अगोदर बिटको चौक, नाशिक रोड आणि तेथून भगूर रोडने बस अथवा शेअर रिक्षाने लेसली सहानी सेंटर येथे यावे.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट**
**सहशिक्षण कार्यक्रम**
भावना सूर्यवंशी  : ७३५०६२१८८६    अविनाश नेवे   : ९८८१४५६३२३
पत्ता : ३१-ए, कल्याणी नगर, आनंदवल्ली शिवार, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३
फोन नं. ०२५३-२३४६१२८
ईमेल: avinashn.amd@gmail.com

**प्रायोजक**
VOLKART FOUNDATION
INDIAN TRUST